

Operation COVID-19
a kid's guide to defeating aliens
Franklin & Tariello

# कोविद १९ च्या उपऱ्यांना पराभूत करण्यासाठी बालगोपाळांचे मार्गदर्शक पुस्तक

एलिझाबेथ व ॲना फ्रँकलिन

इलॅरिओ व सेरेना तालिरिओ

कोरोना व्हायरस चे चित्र व मजकूर इलॅरिओ तालिरिओ  यांनी परवानगीने वापरला आहे

कॉपीराईट (क) २०२० एलिझाबेथ फ्रँकलिन व इलेरिओ तालिरिओ

हे पुस्तक अमेरिकेतील कॉपीराईट कायद्या  प्रमाणे सुरक्षित आहे. येथील मजकूर  (अल्प किंवा पूर्ण )कोणत्याही स्वरूपात पुनः प्रकाशित करण्यास किंवा व्यापारी तत्वावर वापरण्याची मनाई आहे

# समर्पण पत्रिका

हे पुस्तक त्या अनंत श्रेष्ठ नायकांना समर्पित आहे ज्यांनी ह्या लढ्या मध्ये भाग घेतला
वैद्य, परिचारिका व आरोग्य व्यावसायिक तसेच
पोलीस सरकारी अधिकारी ज्यांनी आपल्या सुरक्षेसाठी कठोर परिश्रम घेतले
धार्मिक गुरु आणि पाद्री ज्यांनी आपले जीवन सर्वांच्या आशीर्वादासाठी वेचले
तसेच ज्यांनी किराणा सामान व औषधे उपलब्ध करून दिली
ज्या कोणी व्यापाऱ्यांनी आपल्या कामकाजातून सर्वतोपरी मदत केली
आणि अशा असंख्य लोकांनी जे ह्या कार्यासाठी ठाम पणे मदतीला उभे ठाकले

हि आमची कहाणी आहे आणि तितकीच तुमची पण आहे

आणि हि समर्पित आहे तुमच्या सारख्या तरुण वाचकांना

तुम्ही सर्वजण देखील असे श्रेष्ठ नायक बनू शकता
जर का तुम्ही मनाशी ठरवलं तरच

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| | आभार | i |
| 1 | कोविड ऑप्स निमंत्रण | 1 |
| 2 | भुंगे व  चक्रीवादळ | 19 |
| 3 | कोविड एक्स आरमार | 23 |
| 4 | कोविड ऑप्स तांत्रिकी प्रशिक्षण | 31 |
| 5 | दुःख व श्रेष्ठ नायक | 39 |
| 6 | पराक्रमी सेना | 43 |
| 7 | कोविड ऑप्स ओळख पत्र | 47 |

# आभार

विशेष आभार सह लेखिका व चित्रकार  सेरेना तालिरिओ

सह लेखिका, संपादिका व मुखपृष्ठ  ऍना फ्रँकलिन

आभार विशेष ऍजेंट्स

तुमच्या अफाट गुणां शिवाय हे सगळं शक्य  झाले  नसतं

तुम्ही सर्वजण तरुण श्रेष्ठ नायक आहात

छायाचित्रकार अँजेला उरसो यांचे खास आभार

# 1-ऑपरेशन कोविद ऑप्स


तुम्ही तुमच्या छुप्या छावणी मध्ये बसला आहेत  एक जरुरी निरोप येण्याची वाट पाहत

तुम्ही तुमच्या छुप्या वेबसाईट वर जात आणि एक सांकेतिक गुप्त कोड वापरता

आणि तुमच्या समोर स्क्रीनवर एक निरोप उमटतो—

*YOU ARE CLEARED FOR COVID OPS TRAINING.*

नंतर  एक तरुणी तुमच्या स्क्रीन वर उमटते





सुस्वागतम, ती म्हणते मी आहे सीक्रेट एजन्ट एना

तुम्ही सर्वजण एका सीक्रेट मिशन साठी निवडले गेले आहेत. थांबा, मला तुम्हाला नीट सांगूद्या

तेवढ्यात स्क्रीन वर एक परग्रहावरील प्राणी अवतरतो

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello




आम्हाला  सूचना मिळाली आहे कि हा व्हायरस आपल्या पृथ्वीवर आक्रमण करतो आहे

ह्यापूर्वी आपल्या ग्रहावर अशा प्रकारचा भयानक वायर्स कधीही आला नव्हता

ह्याचा अर्थ असा आहे कि आपल्या ग्रहावर एका नवीन प्रकारच्या व्हायरसचा वावर सुरु झाला  आणि हे युद्ध आपल्याला  करायचे आहे, परग्रहावरील एलियन प्राण्या प्रमाणेच ह्या वायरस सोबत आपल्याला सामना करावयाचा आहे असे ती म्हणाली

मी येथे तुमची मदत मागायला आली  आहे , ह्या वायरस शत्रूला

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

रोखण्यासाठी आपण आपला  एक विशेष आक्रमण संघ तयार करीत आहोत


हा नवीन प्राणी इतका सूक्ष्म आहे तो आपल्या डोळयाला दिसत देखील नाही तरी देखील तो अनेक लोकांना दुखापत करू शकतो

हे एक खास मिशन आहे जे तुम्ही सर्वानी जर स्वीकारले तर आपण आपल्या ग्रहाला ह्या आक्रमण पासून वाचवू शकतो

तुम्ही सर्वानी विचार करावा, तुम्ही सर्वजण ह्या युद्धात आमहाला मदत करायला तयार आहेत का ?

जर तुम्ही तयार असाल तर पुढील पान  उलटा

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello



एना पुन्हा बोलायला सुरवात करते

तुम्हाला वाटत असेल कि हे परग्रहावरील प्राण्यांचे आक्रमण काय आहे? आणि मी एक छोटासा मुलगा किव्वा मुलगी आहे आम्ही कसे काय हे युद्ध करू शकतो?

आपले दोन मोठे सरदार कमांडर तारिएलो आणि कमांडर फ्रँकलिन तुमच्या ह्या प्रश्नांची उत्तरे देतील

कमांडर तारिएलो इटली देशात आहेत आणि त्यांचा देश प्रचंड आक्रमणाला यशस्वी रीत्या तोंड देत आहे त्यांनी त्यांच्या संगणकावर काही विशेष साधने बनवली आहेत ज्यायोगे ते ह्या व्हायरस च्या वेगवेगळ्या आकृत्या तयार करू शकतात ज्यांचा अभ्यास करता येईल

कमांडर तारिएलो किंवा 'कमांडर टी' तुमचे स्वागत करूया ! ते आपणांस त्या वायरस शत्रू बद्दल सांगतील आणि आन कसा त्यांचा सामना करायचा आहे ते देखील सांगतील

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello


आता कमांडर टी स्क्रीनवर अवतीर्ण होतात




"हे आपल्या शत्रूचे चित्र आहे" कमांडर टी म्हणतात, ह्याचे नाव आहे "करोना व्हायरस" किव्वा "कोविड  १९", मी आपल्या

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

साधनां द्‌वारे यांचे चित्र बनवले आहे




हा परग्रहावरील प्राण्याप्रमाणे आपल्या ग्रहावर आक्रमण करीत आहे. आम्हाला असा विश्वास आहे कि प्रथम त्याने चीन देशावर आक्रमण केले आहे परंतु तो आता पूर्ण पृथ्वी वर आक्रमण करीत आहे. ह्या मध्ये एक चांगली बातमी आहे ती म्हणजे त्या व्हायरस ला आपला प्रसार करण्यासाठी मानवाची गरज भासते आहे आणि आपण तो प्रसार घराच्या  आत मध्ये राहून थांबवू शकतो. हा सध्या आपला सर्वात चांगला सुरक्षा उपाय आहे पण त्या साठी आम्हाला तुमचा सहभाग हवा आहे

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

संपूर्ण विश्वातील शास्त्रज्ञ हे आक्रमण थांबविण्या साठी कठोर परिश्रम करीत आहेत. ते त्या साठी एखादे औषध किंवा लस शोधून काढण्याचे प्रयत्न करीत आहेत.. मी मात्र सध्या माझ्या साधनांद्वारे संगणकावर ह्या व्हायरस ची अशी एखादी 'कमजोरी' शोधून काढतो आहे ज्यांचे चित्र संगणक द्वारे आपल्याला स्क्रीन वर शकेल जे सूक्ष्मदर्शक यंत्रा मधून देखील दिसत नाहीये

सर्व राष्ट्रांतील शास्त्रज्ञांना मदत व्हावी ह्या हेतूनेच मी हे पुस्तक लिहायला घेतले आहे कि ज्यायोगे तुम्हाला कळेल की ह्या मध्ये तुम्हा सर्वांचे साहाय्य किती महत्वाचे आहे. माझी प्रिय मैत्रीण लिझ हिला मी विनंती केली की तुम्हा सर्वांना समजावून सांगेल कि आपण ही कोविद १९ ची चित्रे सर्व जग भर कशी काय संक्रमित करू शकतो

माझे संपूर्ण आयुष्य मी केवळ द्रुक व श्राव्य माध्यमं वापरून काम करीत आलो आहे

लहानपणापासूनच मला शास्त्राची गोडी लागली होती. मी शाळेत असताना देखील शास्त्र विषयात प्रवीण होतो. मी मनुष्य शास्त्र मध्ये देखील चांगली प्रगती करत होतो मी शाळेत मुक्त ऋण विद्युत कणांचे (इलेक्ट्रॉन)च्या शास्त्रात पारंगत होतो व तसेच संगणक आणि संगीत वाद्ये या मध्ये देखील मला गती होतीच

वर्षानुवर्षे मी शिकत होतो आणि माझ्या बुद्धीची वृद्धी करीत होतो. मी अनेक उद्योगांमध्ये संगणक प्रणालींचा उपयोग करून संगीत, दूरचित्रवाणी व सैनिक हेलिकॉप्टर्स ह्या क्षेत्रात प्रगती केली आहे

परंतु मी कधीच दृक श्राव्य माध्यम यांच्या विचारा पासून दूर गेलो नाही

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

सुप्रसिद्ध अभियंता लिओनार्दो चीअरिगलिओन यांच्या पासून मी स्फूर्ती घेत आलो आहे

मी पुन्हा ध्वनी व प्रकाश शास्त्र यांचा अभ्यास सुरु केला व माझ्या लक्षात आले की आपणास जे दिसते आहे त्यापेक्षा देखील काहीतरी जास्त महत्वाचे आहे
त्यामुळे मी त्यांची विशेष तर्कनिती द्वारे त्या लहरींची चित्रे घेण्यास सुरवात केली आणि मी ह्या विशेष बदलांद्वारे मी शेकडो नवनवीन कार्यक्रम करीत गेलो आहे

तुम्हाला जर ह्या शास्त्रांत  गती असेल तर तुम्ही विशेष गोष्टींचा अभ्यास करून त्या क्षेत्रात वृद्धी करू शकता, कोणाला कधी व कुठल्या प्रकारे तुम्ही मदत करू शकता ते तुम्हाला कळणार देखील नाही

जेव्हा कोविद -१९ ने चीन मध्ये आक्रमण सुरु केले त्यावेळेस शास्त्रज्ञांना हे काळात नव्हते की हा व्हायरस मानवांवर कोणत्या प्रकारे आक्रमण करतो आहे त्यावेळी माझ्या लक्षात आले की चित्रे त्यांना मदत करतील आणि खरोखरच ती चित्रे त्यांना मदत करीत आहेत

ज्या शास्त्रज्ञांना 'विषाणू शास्त्रज्ञ' म्हणतात त्यांच्या बरोबर मी आता काम करीत आहे. माझ्या चित्रांद्वारे त्यांना पूर्वी कधीही ज्या पद्धती पाहायला मिळाल्या  नाहीत अशा प्रकारे  त्यांना आता त्या पाहायला मिळत आहेत. सध्या मी दोघां बरोबर काम करीत आहे आणि शिवाय आणखी कोणी ह्या विषयी मदत करतील ते पाहत आहे  आहे. लवकरच आम्हाला त्या व्हायरसची कमजोरी काय आहे ते शोधायला मदत होईल असा विश्वास आहे

आपले काम खूप महत्वाचे आहे आणि आपल्याला त्या व्हायरसची कमजोरी शोधायला वेळ लागू शकतो परंतु तोपर्यंत

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

जगातील सर्व आई वडील, मुले व मुली, तरुण व वृद्ध या सर्वांना ह्या परग्रहावरील आक्रमणा समान असलेल्या व्हायरसला कसे थोपवून धरायचे ह्याचा प्रयत्न करायला हवा

माझ्या प्रमाणेच ह्या युद्धात तुम्हाला सर्वांना खूप महत्वाची कामगिरी बजावायची आहे, त्यामुळे खूप विश्वासाने ह्यामध्ये सहभागी व्हा, सर्वजण खूप धोक्यात आहेत पण आपण त्यांना वाचवू शकतो

धन्यवाद

कमांडर टी ने तुम्हाला काय सांगितले आहे त्याचा विचार करा

ते खूप विलक्षण आणि मदतीचे वाटते आहे

तुम्हाला माहित आहे कि हे खूप महत्वाचे कार्य आहे

ते तुम्ही करू शकता असे वाटते आहे का ?

तुम्ही तर एक लहान मूल आहेत

कि तुम्ही करू शकता ?

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

# 2 दोन छोटी चक्रीवादळे


## एजन्ट एना पुन्हा अवतीर्ण होते



“यानंतर कमांडर फ्रँकलिन तुम्हाला इथे का बोलावले आहे त्या कार्या बद्दलच्या तुमच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देतील त्यांनी यापूर्वीच विशेष ऑप्स संघाची यादी बनवली आहे, कमांड फ्रँकलिन आपले स्वागत आहे”

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

कमांडर फ्रँकलिन स्क्रीन वर अवतीर्ण होते



आमच्या भावी एजन्ट इथे हजर राहिल्याबद्दल आपले आभार, मला  कमांडर लिझ किंवा सांकेतिक भाषेत 'मामा लिझ' म्हणा

जेव्हा कमांडर टी यांनी आम्हाला ह्या परग्रहावरील एलिएन समान असलेल्या ह्या व्हायरस विरुद्धच्या युद्धात यशस्वी होण्यासाठी ते काय करीत आहेत व तुम्हाला सर्वांना काय करायचे आहे ते सांगितले तेव्हा मला तुमची आठवण झाली

मी अनेक वर्षे तरुण आणि मुले यांनी  'थोर कार्य' करण्याचे प्रशिक्षण देण्याचे कार्य करीत आले आहे. तेव्हा या युद्धामध्ये आम्हाला मदत करण्यासाठी तुम्ही खूप विशेष कामगिरी कराल असा मला विश्वास वाटतो. तुम्ही स्वतःला खूप लहान समजत असाल परंतु आम्ही तसे मानत  नाही

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

जेव्हा मी तुमच्या कडे पहाते  तेव्हा मला खूप मोठी विलक्षण 'संभाव्य शक्ती' दिसते

तुम्हाला असे वाटत असेल की "आम्ही तर छोटी मुले आहोत आम्ही काय युद्ध करणार ?"

मी येथे आले आहे ते तुम्हाला सांगायला की  मला असे वाटत नाही "तुम्ही छोटी मुले आहात, मला तुमच्या मध्ये विलक्षण शक्ती दिसते आहे"

आणि तुम्ही सर्व जण एकत्र काम कराल तेव्हा मला एक सेने असल्या सारखे वाटेल, तुम्ही सर्व जण इतके शक्तिमान आहेत कि आम्हाला असे वाटते कि तुम्ही  इतिहास  बदलू शकता

वय हा फक्त एक क्रमांक आहे

तुम्ही किती लहान आहात हा प्रश्नच उद्भवत नाही

तुम्ही देखील मोठया माणसांप्रमाणे ह्या युद्धात सामना करू शकता

हे खरे आहे की फक्त आपले विचारच आपल्याला थांबवू शकतात

भुंग्याने जर विचार केला की लोक आपल्याला 'जाड्या' बोलतात म्हणून आपण उडूच नये तर काय होईल

आपण एवढं जड आणि आपले पंख एवढे लहान आहेत तर?

तर त्याला उडताच येणार नाही

पण त्याला येते

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

पण  त्यांचे पंख भिरभिरतात आणि त्यामुळे छोटीचक्री वादळे निर्माण होतात

त्याच प्रमाणे तुम्हाला एक खूप मोठे कार्य  करायचे आहे

लोक फक्त तुमचे इवले पंख बघतात

पण मला तुमची ती छोटी चक्री  वादळे दिसत आहेत

मला तुम्ही हवे आहात , सर्व जगाला तुम्ही हवे आहात

कृपया हे कार्य स्वीकार करा आणि  आम्हाला मदत करा

धन्यवाद

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

# 3 कोविद ऑप्स चिलखत

## विशेष एजन्ट एना  पुन्हा अवतीर्ण होते



बाहेर पहा

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

विशेष एजन्ट सेरेना तुम्हाला एक ड्रोन पाठवत आहे

त्यामध्ये तुमचे चिलखत व शस्त्रे यांचा एक खास गठ्ठा आहे

तुम्ही कोणासोबत युद्ध करायचे आहे ते ती तुम्हाला दाखवेल



तुमच्या खिडकी बाहेर पहा

एक ड्रोन तुमचा गठ्ठा घेऊन आला आहे

तुम्ही खिडकी उघडून तो गठ्ठा ताब्यात घ्या

ते खूप जड आहे , तुम्ही विचार करता आहे तरी काय ह्यात

खरंच काही तरी धोकादायक आहे कि काय

विशेष एजन्ट सेरेना स्क्रीन वर अवतीर्ण होते

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello



ती हसून म्हणते, मी विशेष एजन्ट सेरेना आहे

माझे काम तुम्हाला ह्या परग्रहावरील प्राण्यांसमान असणाऱ्या एलियन शी युद्ध कसे करावे हे दाखवणे आहे

सर्व प्रथम तुम्हाला लढाऊ सेने होण्या साठी शस्त्रे लागतील

हे पाहा ह्या युद्धातील श्रेष्ठ नायकाचे चित्र

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello




आम्ही तुम्हाला काही साबण व सॅनिटायझर दिला आहे. तो व्हायरस पळवून लावण्यासाठी तो कसा वापरायचा हे आम्ही तुम्हाला शिकवू

नंतर आम्ही तुम्हाला अंगावर चिलखत घालू. तुमच्या अंगावर तुम्ही हातमोजे व मुखवटा लावायला हवे ज्यामुळे तुमचे ह्या अलिएन पासून रक्षण होईल

त्या प्रमाणे जेव्हा तुमचे अधिकारी तुम्हाला इशारा देतील की तुमच्या शहराला आता आक्रमणाचा धोका आहे तेव्हा तुम्ही तयार असाल

तुम्ही हे लक्षात ठेवायला हवे कि जेव्हा व्हायरस तुमच्या शहरात येईल आणि तुमच्या जवळ लोक असतील तेव्हा तुमचे चिलखत तुम्ही सतत घालायला हवे

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello




जर तुम्हाला नायक व्हायचे  असेल तर तुम्ही हि साधने वापरून तुम्हाला सुरक्षित ठेवायला हवे आणि तुमच्या पालकांना देखील हि चिलखत घालायला हवी

शेवटी, ह्या व्हायरस शत्रूपासून सर्वात प्रभावी शस्त्र कोणते असेल तर ते तुमचे स्वतःचे घर


होय, तुमचे घर. ते तुमचे गुप्त एजन्ट लपायची जागा आहे. अधिकारी जेव्हा "घरी सुरक्षित राहा " अशी सूचना देतील किंवा "आश्रय स्थान " किंवा "संपूर्ण विलगीकरण स्थान " घोषित करतील माझ्या शहरात, तेव्हा कोणीही तिथून परवानगीशिवाय बाहेर जाऊ शकणार नाही. तुमच्या विभागात किती लोक ह्या अलिएन व्हायरस च्या प्रभावा  खाली आले आहेत त्यावर हे वलंबून आहे

तुम्हाला घरी थांबण्याची सूचना ते अधिकार देतील कारण त्यामुळे तुम्ही सुरक्षित राहाल. जर तुम्ही आणि तुमचे कुटुंब घर बाहेर पडले नाही तर तो शत्रू तुमच्या घरी येणार नाही. तुम्ही सुरक्षित राहाल व तुमचे कुटुंब सुरक्षित राहील

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

माझ्या देशात जर का आधी पासून लोकांनी हे केले असते तर माझी खात्री आहे कि हा एलियन व्हायरस इतका पसरला नसता

मला माहित आहे की हे कठीण आहे. मला माहित आहे की तुम्हाला बाहेर जाण्याची इच्छा होईल. तुम्हाला तुमचे मित्र आठवतील परंतु तम्ही सर्व जर आपापल्या घरी राहिलात तर हा एलियन व्हायरस नक्की संपवता येईल. जरा कोणी बाहेर पडला नाही तर त्यांचा प्रसार होणार नाही आणि आणखी कोणावर प्रभाव होणार नाही. एलियन शत्रू चा नायनाट होईल



Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

म्हणून, तुम्ही आणि जवळचे सर्वजण सुरक्षित व आरोग्यपूर्ण राहा. जेव्हा गरज पडेल तेव्हा घरी थांबा. तुम्ही नायक बानू शकता जेव्हा तुम्हाला हवे तेव्हा. परंतु तुम्हाला खरोखरच व्हायचे असेल तेव्हाच

जेव्हा तुमचे पालक बाहेर खरेदीसाठी जाण्यासाठी निघतील तेव्हा तुम्ही त्याना शांतपणे आठवण करून द्यावी किट बाहेर अज्ञात एलियन शत्रू बसला आहे त्यासाठी बाहेर जाणे टाळावे

त्याना विचारा की तुम्ही आजारी पडणे किती किमती आहे

त्यांना विचारा की इतरांना आजारी पाडणे किती किमतीचे आहे

त्यांना विचार बाहेर जाणे खरोखरच खूप गरजेचे आहे का

जर नसेल, तर त्यांना कृपया घरीच थांबायला सांगा


जर आपण त्या शत्रूशी सामना केलात तरच आपण जिंकू, आणि त्यासाठी सर्वात चांगला मार्ग आहे घरूनच युद्ध करावे

घरीच थांबा आणि तुम्हाला गरज लागल्यास आम्हाला कळवा आपण सर्वजण कॉवीड १९ पेक्षा शक्तिशाली आहोत

छोट्या दोस्तांनो, हेच लक्षात ठेवा
जा आणि जग बदलून टाका, तुम्हाला शुभेच्छा

आता विशेष एजन्ट एना तुम्हाला रणनीतीचे खेळ शिकवेल.तुम्ही तुमचे चिलखत आणि शस्त्रे कशी वापरायची ते ती तुम्हाला दाखवेल

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello



Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

# 4 कोविड ऑप्स
# रणनीतीचे प्रशिक्षण

तुम्ही तुमच्या पेटी कडे बघा. हे सगळे  सामान त्या एलियन व्हायरसला मारेल? तुम्हाला माहित नव्हते की हे सगळे इतके शक्तिशाली आहे. तुम्हाला खूप उत्साह आला आहे कि हे सगळे कसे वापरायचे

विशेष एजन्ट एना स्क्रीन वर अवतीर्ण होते




तुम्ही आधीच मला ओळखता. मी विशेष एजेंट एना आहे आणि मी तुम्हला तुमचे चिलखत आणि शस्त्रे कशी वापरायची ते दाखवणार आहे. तुमच्या रणनीती प्रशिक्षणाची आता वेळ झाली आहे. तुमची पेटी उघडा

आता काळजीपूर्वक तुमची पेटी उघडा, त्यामध्ये एक कुलूप लावलेली पिशवी आहे

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

"हा खूप किमती पोशाख आहे" एना म्हणाली

"तुमचा सांकेतिक कोड आहे कॉवीड -ऑप्स"

"तुम्ही सांकेतिक कोड वापरता आणि ती पिशवी हिस करून उघडते,त्या मध्ये साबण आणि सॅनिटायझर च्या बाटल्या आहेत

"हि तुमची शस्त्रे आहेत,  तुमच्या शत्रूला मारायला हि सर्वात चांगली आहेत. आता उभे राहा आणि मी तुम्हाला शिकवते कसे युद्‌ध करायचे

तुम्ही सगळ्या शस्त्रं सोबत उभे राहता

"हा एलियन व्हायरस आपल्या हातावरून प्रवास करतो. त्यामुळे आपण त्याला हातावरच मारू शकतो. तुमचा सॅनिटायझर सतत जवळ ठेवा . कशालाही हात लावला कि त्याला वापर विशेषतः तुम्ही बाहेर असाल तेव्हा जास्त वेळा वापर करा. नेहमी तुमचे हात स्वच्छ धुवा . प्रयेक वेळी तुम्ही बाहेरून येत तेव्हा कशाला हि हात लावण्यापूर्वी, काही खाण्यापूर्वी, तुमच्या संगणकाला हात लावण्यापूर्वी, तुमच्या खेळण्यांना हाल लावण्यापूर्वी, दरवाजांना हात लावल्यानंतर प्रत्येक गेलीस हि तुमची शस्त्रे वापरा

एक छोटे बेसिन तुच्या गुप्त तळा मधून बाहेर येते

एना सांगते "पाणी सुरु करा"

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello



तुम्ही पाणी सुरु करता

आता हातावर साबण घ्या आणि हाताचे सर्व भाग नीट चोळा, पुढे मागे, बोटांमध्ये अंगठ्यापासून करंगळी पर्यंत भरपूर चोळा, जो पर्यंत तुम्ही "हॅप्पी बर्थडे टू यू " दोन वेळ म्हणता तेढ वेळ चोळा, त्यामुळे तुमचा शत्रू धुतला जाईल

तुम्ही चोळा, चोळा आणि चोळत राहा

आता स्वच्छ हात धुवा, नळ सुरु करताना आणि बंद करताना कागदी नॅपकिन वापर करा. हे लक्षात ठेवा की एलियन शत्रू तुम्ही हात लावता त्याठिकाणी अनेक दिवस राहू शकतो, त्यामुळे तुम्ही हात लावेल त्या गोष्टीवर तो पुन्हा येऊ शकतो. तुम्ही हात लावत असलेल्या गोष्टींवर तो व्हायरस लपून बसलेला असेल तसेच इतर कोणी हात लावत असलेल्या गोष्टींवर देखील तो असू शकतो म्हणून दरवाजा उघडताना कागदी नॅपकिन किंवा तुमच्या कपड्याच्या बाहीने उघडा

तुकम्हे हात देखील कागदी नॅपकिन ने कोरडे करा, तुमच्या हातात नॅपकिन ठेवून नळ बंद करा, दिवा बंद करा आणि दरवाजा देखील तसाच बंद करा

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

विशेष एजन्ट एना म्हणाली " तुम्ही शिकत आहात " ते विसरू नका ", ह्या युद्धात हि खूप गंभीर बाब आहे जी तुम्हाला सुरक्षित ठेवेल, आता तुमचे चिलखत वापरूया


जेव्हा अधिकारी तुम्हाला सूचना देतील कि हा शत्रू व्हायरस तुमच्या शहरात आला आहे तेव्हा तुम्ही सर्वांनी हा मुखवटा बाहेर जाताना लावला पाहिजे. हातमोजे असल्यास ते देखील घालावे. त्या मुले हा एलियन व्हायरस तुमच्यावर लगेच हल्ला करू शकणार नाही

एजन्ट एना म्हणाली " आता परीक्षा घेऊया, तुम्ही तयार आहेत ना?

"छान, एना म्हणाली "एक क्षण थांबा " कल्पना करा कि तुमच्या नाकाला खाज आली आहे पण तुम्ही चेहऱ्याला हात लावू नका. तसे करू शकता? किती वेळ तुम्ही राहू शकता ? ह्या कार्यामध्ये एका गोष्टीची तुम्हाला सवय करून घ्यायला हवी ती म्हणजे कधीच चेहऱ्याला डोळ्यांना, नाकाला, तोंडाला हात लावू नका. कारण शत्रू तुमच्या हातावर असतो आणि त्यानंतर तो तुमच्या चेहेऱ्यावर हल्ला करू शकतो, म्हणून कधीच चेहेऱ्याला हात लावू नका, ही कठीण परीक्षा तुम्ही उत्तीर्ण व्हायलाच हवी तरच तुम्ही एक उत्तम एजन्ट बानू शकता"

जर तुमच्या नाकाला खाज येत असेल आणि तुम्हाला माहित आहे आपण हात लावू शकत नाही तेव्हा दुर्लक्ष करा "

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello



हा एलियन शत्रू शिंकण्यातून किंवा खोकल्यातून देखील संक्रमित होऊ शकतो, त्यामुळे तुम्हाला अशा लोकांपासून दूर राहायला हवे आणि कमीत कमी २ मीटर किंवा ६ फूट अंतर ठेवले पाहिजे, म्हणजे जवळ जवळ एका पलंग एवढे अंतर ठेवावे, एका बाजूला तुम्ही राहा आणि दुसऱ्या बाजूला त्यांना ठेवा, जेवढं लांब राहता येईल ते चांगले. तुम्ही पलंगाच्या एका बाजूला उभे राहुन पहा दुसरी बाजू किती दूर आहे ते

तुम्ही पलंगाच्या एका बाजूला उभे राहून पहा "अरे वा खरंच एवढे लांब आहोत आपण." लोकांना मिठी मारू नका किंवा हस्तांदोलन करू नका, दुरूनच नमस्कार करा किंवा जस्ट हाय करा स्पर्श न करता, लक्षात ठेवा कि तुमची शिंक किंवा खोकला व्हायरस पसरवू शकतो. मगर खोकला काढा, म्हणजे तुमचा हात मगरीच्या तोंड प्रमाणे नाका तोंडावर कोपराजवळ बाही आणून त्याम मध्ये शिंका किंवा खोका म्हणजे तुमचे संक्रमण दुसऱ्याला होणार नाही

"खिन्न पणे असे सांगावे लागते आहे की तुम्ही खेळायला मैदानावर जाऊ शकणार नाही तेव्हा घरीच राहा

खूप महत्वाचे म्हणजे तुमची उपकरणे टॅबलेट, संगणक, लॅपटॉप, फोन, चष्मा वगैरे सर्व वस्तू नीट पुसून घ्या कारण

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

तिथे तुमचा शत्रू राहू शकतो, त्यामुळे तुमच्या सर्व वस्तू नॅपकिनने पुसून मगच वापर करा

आता मला माहित आहेत हे सगळे खूप भीतीदायक आहे आणि विशेष एजन्ट होणे तितके सोपे नाहीये, पण लक्षात ठेवा कि गोंधळ करू नका, तुम्हाला भीती वाटत असेल तर तुमच्या वयस्क व्यक्तींना सांगा तुमच्या भीतीबद्दल

हे सगळे जास्त दिवस टिकणार नाहीये, लवकरच आपण हे युद्ध जिंकू आणि मग सगळे काही पूर्ववत होईल

आता तुमची परीक्षेची वेळ आली  आहे

मला दाखवा पाहू :

1. तुम्ही हात कसे धुता
2. तुम्ही पाणी कसे सुरु करता आणि दिवे कसे लावता
3. तुम्ही दरवाजे कसे उघडता
4. तुम्ही तुमचे शस्त्र कसे
5. तुमच्या चेहऱ्यावर खाज आल्यास काय करता
6. तुम्ही बाजूच्या लोकांपासून दूर किती व कसे राहता
7. भेटणाऱ्या लोकांना कसे भेटता
8. तुम्ही कसे खोकत
9. तुम्ही कसे शिंकता
10. तुम्हाला भीती वाटली तर तुम्ही कोणाशी बोलता

आता तुम्ही दमला असाल, हे खूप जास्त तीव्र प्रमाणात प्रशिक्षण होते

छान केलेत "एजन्ट एना म्हणाली "तुमचे प्रशिक्षण संपले आहे, तुम्ही आता बऱ्यापैकी तयार झाला आहात


Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

तुम्ही आता पूर्णपणे प्रशिक्षित व तयार झाला आहेत आणि तुम्हाला आता जास्त मजबूत वाटते आहे, तुम्हाला ज्ञान, युक्त्या, शस्त्रे सर्वकाही येते आहे आणि तुम्ही शत्रूवर हल्ला करण्यासाठी पूर्णपणे तयारीत आहात, तुम्ही एक एजन्ट म्हणून युद्धासाठी सिद्ध आहात

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

# 5 खिन्नपणा आणि श्रेष्ठ नायक

कमांडर टी स्क्रीन वर अवतीर्ण होतो



" तुमचे पुन्हा स्वागत! तो म्हणाला . तुम्ही पूर्वी होतात त्यापेक्षा आता खूप  वेगळे दिसत आहात. मी एक क्षण घेतो आणि तुम्हाला काही गोष्टी सांगतो."

ह्या शत्रू विरुद्धच्या युद्धात खिन्नता आहे

हा शत्रू आपला फायदा करून घेतो आहे कारण आपण सगळे स्वार्थीपणे वागत असतो

आपल्याला जे हवे ते हवेच असते" आपण आपल्या मार्गानेच जाण्यावर ठाम असतो. आपण नियम पळत नाही कारण ते वेगळे असतात

लोक खूप म्हणजे खूप आजारी पडू शकतात

त्यांना टॅप येतो, खोकला, दम लागतो, थकवा येतो, नुमोनिया होतो आणि काही जण मरण पावतात

खासकरून जे वृद्ध आहेत ते आणि जे आजारी आहेत ते जास्त बळी पडतात

हि खिन्नता कधी कधी फार भारावून टाकते. आपण जेव्हा बातम्या पाहतो तेव्हा आपल्याला तसे वाटते, तुम्ही तुमच्या पालकांशी जरूर पडल्यास बोलावे

वैद्य आणि परिचारिका जे सतत खूप काम करतात आणि रुग्ण सेवा करत असतात त्यांना जास्त धोका असतो

विश्रांती नाही, मदत नाही

सर्व इस्पितळे भरलेली असतात आणी तिथे तो एलियन व्हायरस खूप वेगाने प्रसार करतो

रुग्ण अतिशय काळजी विभागात राहतात जिथे ते एकटे पडतात आणि दुःखी होतात

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

एकटेपणा दुःखीपणा
अनेकदा त्यांना शक्तिहीन वाटते

तसेच हे युद्ध असते

परंतु त्याच वेळेस तिथे काही श्रेष्ठ नायक असतात जे रोज हे युद्ध लढतात

पोलीस अधिकारी, सैनिक सरकारी अधिकारी जे ह्या लोकांना नियम पाळण्यास  मदत करतात

निवृत्त वैद्य देखील इस्पितळात परत कामावर येतात

कारखानदार लोकांसाठीं आवश्यक सामुग्री बनवतात

काही हुशार टेक्निकी लोक एकाच सामुग्री वर दोघांना उपयोगी पडेल याची सोय करतात

शिंपी लोक मुखवटे शिवून तयार करतात

मोटारी कारखानदार मोटारी बंद करून श्वसन सामुग्री बनवतात

उपहारगृहे मुले व वैद्य लोकांसाठी मोफत भोजन देतात

जगभरातील किती तरी नायक स्वखुशीने  ह्या कार्यात उडी घेऊन मदत करतात

त्या सर्व लोकांना धन्यवाद जे कोणी ह्या कार्यात आपल्या कामा पेक्षा बाहेर जाऊन जास्त मेहनत करून ह्या युद्धाला मदत करतात

तिथे काही जण असे आहेत जे स्कुबा डायविंग मास्क वापरून

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

नवीन मुखवटे बनवतात

काही नायक छोट्या आकारात पण येतात

माझ्या देशात एका छोट्या मुलीने पोलिसांना पात्र लिहून धन्यवाद दिले, त्यामुळे मझय देशातील अनेक लोकांची मने जिंकली आणि त्यामुळे लोकांना आठवण करून दिली कि आपणही सर्व मदत करणाऱ्यांचे आभार मानले पाहिजेत

तिच्या कडून आपण आभार मानण्याच्या शक्तीचे शिक्षण घेतले

आपण लोकांना काही काळजी न करता मदत करण्याचे नवीन काही शिकत आहोत

आपण पुन्हा मानवधर्म शिकत आहोत

एका वृद्ध धर्मगुरू ने आपला प्राणवायू न घेता दुसर्या रुग्णांसाठी दिला तेव्हा आपल्याला कुर्बानीचे महत्व कळते

आपल्याला पुन्हा एकदा मानवतेचे आणि लोकांचं सेवेचे महत्व कळू लागले आहे

प्रत्येकजण मदत करण्यासाठी प्रयत्न करतो आहे, परंतु आपण प्रत्येकाने जवाबदारीने वागले पाहिजे आणि घरा मध्ये राहिले पाहिजे त्यामुळे ह्या व्हायरस चा प्रसार जास्त होणार नाही आणि तिथेच आपली जवाबदारी येते आहे

हे सगळे क्षणिक आहे आणि आपण जो पर्यंत जिंकत नाही तोवर प्रतिकार करत राहायला हवा आणि आपण जिंकू फक्त काही वेळचा प्रश्न आहे

हि वेळ आपल्यावर अली आहे आणि तुमची नवीन पिढी ह्या

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

वेळेस उभी राहिली आहे ती एक नवीन इतिहास लिहिण्याची संधी घेयून ज्यामुळे एका विषाणूचा आपण बिमोड करू शकलो

तुमचा आवाज इतिहास बदलू शकतो

मोठ्या लोकांना आठवण करून द्या नियम पाळण्यासाठी आणि त्यानं सांगा घरी राहा, त्यांना सांगा तुम्हाला किती काळजी आहे आणि ते किती महत्वाचे आहेत तुमच्या  साठी , तुम्हाला जास्त प्रशिक्षण मिळाले आहे

तुम्ही मोठ्या लोकांचा आवाज बाणा आणि ते तुमचे ऐकतील


माझा देश इटली आहे आणि ह्या वेळेस अगदी युद्धाच्या मध्यभागी आहेत, मी ते रोज  पाहतो कमांडर लिझ चा देश आणि तुमचा देश आहे अजूनही वेळ आहे त्या शत्रूला थांबवण्याची आणि इतर देशांना सांगण्याची  त्यामुळेसच मी तुमची मदत मागतो आहे

घरी राहा आणि सुरक्षीत राहा मजबूत राहा छोट्या दोस्तांनो

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

# 6 एक बलवान सेना

कमांडर लिझ स्क्रीन वर अवतीर्ण होते




मग आता, माझ्या बलवान सेनापतींनो, हि निर्णयाची वेळ आहे. तुम्हाला सुद्धा श्रेष्ठ नायक व्हायचं आहे का ?

तुम्ही कमांडर टी च्या कृपेने ह्या एलियन व्हायरस ला भेटलात आणि त्याचे कुकर्म देखील पहिले आहेत

मी तुम्हाला दाखवून दिले आहे की तुम्ही खूप मौल्यवान आहात आणि तुम्ही भव्य कामे करू शकता

तुम्हाला विशेष एजन्ट सेरेना ने युद्धासाठी चिलखत व साधने दिली आहेत तसेच विशेष एजन्ट एना ने  तुम्हाला दाखवले आहे तुम्ही कसे युद्ध करायचे ते

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

तुम्ही खिन्नता अनुभवली आहे आणि तुम्ही श्रेष्ठ नायकांच्या कथा ऐकल्या आहेत

आता ह्या वेळी तुम्ही मैदानात उतरू शकता आणि श्रेष्ठ नायक बनू शकता. प्रत्येक वेळी तुम्ही घरात राहाचे ठरवा. प्रत्येक वेळेस तुम्ही लक्षात ठेवा की एलियन व्हायरस दूर तुमच्या पासून आणि इतरां पासून दूर ठेवण्यासाठी काय करायचे आहे

प्रत्येक वेळेस तुम्ही दुसर्याना पर्याप्त निवड करून आत मध्ये राहण्यासाठी मदत करा. तुम्ही श्रेष्ठ नायक आहात



तुम्ही आणि जगातील इतर लाखो मुलांबरोबर इतिहास घडवू शकता
प्रश्न हा आहे की, तुम्ही करू शकता कां ? तुम्ही पुढची पायरी गाठू शकता ?

घरी राहण्यासाठी तुम्ही आवाज उठवू शकता ?
तुम्ही जे काही शिकला आहेत ते सर्व तुम्ही एलियन व्हायरस शी युद्ध करण्यासाठी वापरू शकता?

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

जर तुमचे उत्तर हो असेल तर पुढचे पण उलट. तुम्हाला कॉवीड -ऑप्स चे ओळख पत्र मिळेल

त्यामुळे तुम्ही प्रशिक्षित एजन्ट म्हणून कॉवीड -ऑप्स संघा मध्ये ओळखले जाल

जर तुमची तयारी नसेल तर ह्या पत्रावर  तुमची स्वाक्षरी करू नये

हा काही खेळ नाहीए. हे खरे आहे

आम्हाला तुम्ही हवे आहात

जर तुम्ही हे कार्य स्वीकार करण्यास तयार असाल तरच तुम्ही पत्रावर तुमची सही करा, तेथून ते कापा आणि विशेष जागी ठेवा जिथून तुम्हाला ते रोज दिसू शकेल आणि तुम्हाला आठवण करून देईल कि तुम्ही जगाला वाचवण्याच्या कामी महत्वाची कामगिरी करत आहात

कृपया आम्ही तुम्हाला काय शिकवले आहे ते विसरू नका

कॉवीड -ऑप्स संघातील विशेष एजन्ट म्हणून तुमचे स्वागत करताना आम्हाला गौरवास्पद वाटत आहे

आत मध्ये राहा, सुरक्षित राहा, मजबूत राहा

चला आता जाऊया आणि विशेष एजन्ट म्हणून जगाला वाचवूया”

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

कोविड ऑप्स संघाचे विशेष एजन्ट म्हणून आपले स्वागत आहे



तुमचे विशेष एजन्ट म्हणून ओळख पत्र कापून घ्या

ते तुमच्या जवळ सतत बाळगा ते तुम्हाला तुमच्या कार्याची सतत आठवण करत राहील

पुढील पानावरुन काप आणि तुमच्या दरवाजावर चिकटवा

कमांडर टी आणि कमांडर लिझ  ला तुम्ही ई-मेल करू शकता [agent@covidops.info](mailto:agent@covidops.info)

आमची वेब साईट [www.covidops.info](http://www.covidops.info) वर जाऊन जास्त माहिती मिळवा, जेव्हा तुम्ही एलियन व्हायरस चे आक्रमण थोपवाल तेव्हा

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

कमांडर टी  सोबत संघ एक जिवंत पुस्तक वाचा आणि मजेदार गोष्टी करा

घरी राहा, सुरक्षित राहा, मजबूत राहा



# COVID-OPS
# AGENT SPECIAL

**MY NAME** ______________________________

I WILL:

- WASH MY HANDS
- USE HAND SANITIZER
- WEAR MY MASK AND GLOVES
- STAY INSIDE
- COVER MY COUGHS AND SNEEZES
- NOT TOUCH MY FACE

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

# लेखकांविषयी

फ्रँकलिन आणि टेरिएलो  कुटुंब सात समुद्रा  पलीकडे एका गुप्त कार्या  साठी निघाले आहेत ज्यामध्ये कोवीड -१९ विरुद्ध च्या युद्धात सर्व मुलांना प्रशिक्षण देऊन श्रेष्ठ नायक बनवण्यासाठी कटिबद्ध आहेत



**Ilario Tariello, Commander T,** is a pioneer of new cutting-edge ways to aid in virus study using very advanced patented computer ideas and imaging that have been created over years of study. He has worked with virologists to bring image dynamics to their work previously unseen even by high-powered microscopes. He is an IT specialist. His big heart to help others stay safe inspired this book. His words capture this moment in time in Italy as well as his passion to make a difference in fighting this virus. www.IlarioTariello.com



**Elizabeth Franklin, Commander Liz,** or Mama Liz writes books and speaks to children, teens, and college students to empower them to greatness in the areas of time and success. She saw the potential in this mighty army of children, and how they could be superheroes right in their own homes. She wants to help America and other countries avoid the same fate as Italy. www.lizfranklin.com

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

 **Special Agent Serena Tariello** is in high school with an interest in architecture and music. She is a black belt in karate and her dream is to become an actress. She speaks as a teenager who is living in the closed-down cities of Italy. She has used her artistic talent to create these illustrations and bring life to our ideas.

 **Special Agent Anna Franklin** is studying Communication Studies and Geography (meteorology concentration) at the University of Tennessee. She is an author, speaker, and researcher who wants to help everyone be more prepared for severe weather. She has written two children's series and dances. She brought her heart for preparedness into this book. [www.AnnaEFranklin.com](http://www.AnnaEFranklin.com)

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello

# तुम्हाला खरंच कुठे जायचे आहे का ?

Copyright @2020 Elizabeth Franklin and Ilario Tariello